राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

तक्रार क्र.रामाआ-१६८/२०१७/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| प्रशांत डी. दांगट | नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय जुन्नर ता. जुन्नर, जि. पुणे | तहसिलदार, तहसिल कार्यालय जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे |

<u>तक्रार सुनावणी दि.४/९/२०२४</u>

तक्रारदार यांनी आयोगाकडे दि.२३/११/२०१७ रोजी तक्रार अर्ज केला आहे. त्याध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी, यांनी माहिती दिली नाही, अपिल आदेश दिला नाही, अशी अशी तक्रार केली आहे.

आयोजीत सुनावणीचेवेळी तक्रार अनुपस्थित होते. तर विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीमती सारिका सुधाकर रासकर, हजर होते.

सुनावणीचेवेळी श्रीमती सारिका सुधाकर रासकर, निवासी नायब तहसिलदार, जुन्नर यानी सुचित केले की, तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री. सुधाकर वळवी यांनी आयोग आदेशाची अंमबजावणी केली नाही. ते आता सेवानिवृत्त आहेत. तत्कालिन अपिलीय अधिकारी यांनी अपिल सुनावणी घेतली नाही, आदेश पारीत कला नाही.

आयोगाकडील उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येते की, तक्रारदारास आत सर्व माहिती पुरविली आहे, तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.सुधाकर वळवी आता सेवानिवृत्त आहेत. तथापि, अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, जुन्नर यानी प्रथम अपिल आदेश पारीत केला नाही,

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

जिल्हाधिकारी, पुणे यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार जुन्नर ता.जुन्नर जिल्हा पुणे यांनी प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन, आदेश पारीत केला नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम-१९(६) तसेच शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/११८२/प्र.क्र. ६५/०७/६(मा.अ) दि.१२/१२/२००७ व परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/ प्र. क्र.१५४/०७/०६ दि.३१/३/२००८ मधील तरतुदींचे उल्लंघन केले आहे. त्यामुळे त्यांचेविरुद्ध सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार कार्यवाही करावी. या निर्देशांसह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. 5345/2024 दिनांक - 7/10/2024

<u>प्रतिलिपी-माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाही साठी अग्रेषीत.</u>

जिल्हाधिकारी, पुणे.

सदर आदेशाची प्रत सबंधितास बजावून पोच सादर करावी.



रामाआ-पुणे/२०२४-एलएसजी